# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १९-२२** **दिनांक २५/०१/२०२२**

## निर्घृण खुनाचा गुन्हा उघडकीस आणुन त्यातील आरोपीतांना गुन्हे शाखा-२ वसई युनिटकडुन तात्काळ अटक

आचोळे पोलीस ठाणे गु.र.नं. ३८/२०२२ भा.दं.वि.स. कलम ३०२,४५२, १४३,१४४,१४७,१४८,१४९ सह शस्त्र अधिनियम कलम ४,२५ प्रमाणे या गुन्ह्यातील मयत इसम सलिम रशिद खान वय २२ वर्षे रा. वैतीवाडी बाबा कॉलनीचाळ नालासोपारा पु ता.वसई जि पालघर हा त्याचे राहते घरी झोपलेला असताना गुन्हयातील ५ ते ६ अज्ञात आरोपीत यांनी गैरकायदयाची मंडळी जमा करुन हातात धारदार हत्यारे घेउन मयत इसमाचे रुमचा दरवाजाचे लॉक तोडुन मयत इसम सलिम रशिद खान यास घरामध्ये घूसुन त्यास घराचे बाहेर काढुन कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन धारदार हत्याराने वार करून जीवे ठार मारले असल्याबाबत पोलीस शिपाई/१४०५१ किसन नारायण जायभाये वय ३१ वर्षे,नेमणुक-आचोळे पोलीस ठाणे, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांनी सरकारतर्फे दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक दि. २३/०१/२२ रोजी १०.५८ वाजता गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नमुद खुनाचे गुन्हयाचा समांतर तपास करता गुन्हे शाखा-२ वसई युनिटचे अधीकारी व अमंलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन घटनास्थळी भेट देवुन घटनास्थळाचे आजुबाजुचे परीसरातील सी सी टी व्ही कॅमेरांचे फुटेज प्राप्त करुन त्यांचे विश्लेषणातुन व सदर मयत ईसमाचे सोबत गुन्हा घडले दिवशी सोबत असलेले साक्षीदार यांचेकडे केलेल्या चौकशीतुन व बातमीदारांचे कडुन प्राप्त माहीतीव्दारे नमुद गुन्हयातील आरोपीत याची नावे निष्पन्न करुन आरोपीत १) पुरुष इसम वय २३ वर्ष रा. साई प्रतिषा वेलफेअर सोसायटी, डी/ प्रतिक्षानगर, संखेश्वर नालासोपारा पुर्व २) पुरुष ईसम वय १९ वर्ष रा. साईसंकुल सी/२०३, आचोळे डोंगरी, नालासोपारा पुर्व ३) पुरुष इसम १८ वर्ष रा. साई पुजा निवास रुम नं ३०४, संखेश्वर नगर, रामा मेडीकलचे बाजूला, नालासोपारा पुर्व तसेच दोन विधी संघर्ष बालक यांना ताब्यात घेवून नमुद आरोपीत व विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी पुर्व वैमनस्यातुन आरोपीत यास जिवे ठार मारल्याचे निष्पन्न करुन सदरचा गुन्हा घडले तारखेपासुन २४ तासाचे आत उघडकीस आणला आहे.

सदरची कारवाई श्री डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनिरी/सुहास कांबळे, पो.हवा./९५०२१ मंगेश चव्हाण, पो.हवा./९५०१३ रमेश भोसले, पोहवा/९६०३६ संजय नवले, पो.हवा./०३०४९ महेश पागधरे, पो.हवा/०३०५२ चंदन मोरे, पोहवा/०६०२५ सचिन पाटील, पोना/०३०३२ प्रशांतकुमार ठाकुर, पो.ना./०७०९४ प्रशांत पाटील, पो.ना./०५०३३ जगदीश गोवारी, पोना/०६१०७ रमेश आलदर, पो.कॉ./१२०९७ अमोल कोरे, पो कॉ/१२०४७ दादा आडके, पो कॉ/१२०५३ सुधीर नरळे, यांनी केली आहे.